# प्रेसनोट दि. ०१/०६/२०१९

## दोन सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायातुन सुटका केलीबाबत....

गुन्हे शाखेचे श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांना मिळालेल्या बातमी वरुन कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन हद्दीमधील एका नामांकित हॉटेलमध्ये वेश्याव्यवसायासाठी मुंबई येथून आणलेल्या दोन सज्ञान मुलींची सुटका करण्यात आलेली असून वेश्याव्यवसायातील दलाल नामे सुरेशकुमार सुद, वय ७४ वर्षे रा. १०८ किंग्ज अपार्टमेंट, मिरा रोड ठाणे यास पिटा कायदा अंतर्गत अटक करण्यात आलेली आहे.

अटक आरोपी यास दि.०२/०६/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मिळालेली असून तपासाअंतर्गत असे निष्पन्न झाले आहे की, नमुद अटक आरोपी हा शहनाज उर्फ सिमा या वेश्याव्यवसायातील महिला दलालासाठी काम करीत आहे. सदर महिला दलाल ही मुंबई ओशिवारा, अंधेरी याभागातील आहे. अटक आरोपी याचे वय जास्त असल्याने कोणास संशय येणार नाही या करीता त्यांचा वेश्याव्यवसायातील दलाल म्हणून वापर करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच ग्राहकांना विवीध मुलींचे फोटो पाठवून मोठी रक्कम व चांगल्या हॉटेलमध्ये रुम करणेबाबत सांगितले जात असे. त्यानुसार बनावट ग्राहकाव्दारे सापळा रचुन वरील कारवाई करण्यात आलेली आहे. दाखल गुन्ह्याचा पुढील तपास हा पोनि. सौ. मनिषा झेंडे, सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा या करीत आहेत.

सदरची कारवाई ही श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. संभाजी कदम, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. भानुप्रताप बर्गे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, सामाजिक सुरक्षा विभागाकडील पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे, सहा पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप, पोउपनि अनंत व्यवहारे व कर्मचारी यांनी केली.

(भानुप्रताप बर्गे)
सहा. पोलीस आयुक्त,
गुन्हे-२,